# <u>पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०१६</u>
## <u>उमेदवारांना ताकीद</u>

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा 2016 च्या लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम दि.21 नोव्हेंबर, 2016 पासून सुरु झाला आहे. प्रस्तुत शारीरिक चाचणीच्या सरावासाठी उमेदवारांना पुरेसा वेळ मिळावा या उद्देशाने प्रस्तुत पदाच्या "शारीरिक चाचणीचा कार्यक्रम आयोगातर्फे लवकरच जाहिर करण्यात येईल" अशा आशयाची घोषणा दि.15 ऑक्टोबर, 2016 रोजी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली होती. तसेच उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये पाठविण्यात आलेल्या पत्रात "**शारीरिक चाचणीसाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेत बदल करण्याबाबतची विनंती अपरिहार्य/असाधारण कारणाव्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही**" अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. असे असतानाही ब-याच उमेदवारांनी वैद्यकीय किंवा इतर कारणास्तव शारीरिक चाचणीचा दिनांक बदलून मिळणेकरीता आयोगाकडे अर्ज केले आहेत. या व अशा सर्व उमेदवारांचे लक्ष उपरोक्त सूचनेकडे वेधण्यात येत असून ज्या उमेदवारांनी शारीरिक चाचणीचा दिनांक बदलून मिळणेसाठी अर्ज केले आहेत अशा उमेदवारांची विनंती मान्य केली जाईलच असे नाही. तसेच ज्या उमेदवारांनी वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीचा दिनांक बदलून मागितला आहे अशा उमेदवारांना "**वैद्यकीय मंडळासमोर (Medical Board)**" हजर केले जाण्याची शक्यता आहे. याचीही उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांची दिनांक बदलून मिळणेबाबतची विनंती फक्त "अपवादात्मक परिस्थितीत व समर्थनीय कारणासह" अर्ज केला असेल तरच मान्य केली जाईल याचीही उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांनी त्यांना नेमून दिलेल्या दिनांकालाच शारीरिक चाचणीसाठी हजर रहावे अशी त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

फार मोठया प्रमाणावर उमेदवारांकडून तारखा बदलून मागितल्या जात असल्याने अशा विनंत्या मान्य करणे आयोगास शक्य होणार नाही व त्यामुळे उमेदवारांची शारीरिक चाचणीची संधी वाया गेल्यास त्यास उमेदवार जबाबदार असतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव (परीक्षा)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**

**दिनांक — २३ नोव्हेंबर, २०१६**